# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पुनरूत्थान चौथा रविवार – २१ एप्रिल २०२४

## श्रद्धावंताच्या प्रार्थना

**धर्मगुरू ः** माझ्या बंधू भगिनींनो, ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा विश्वास बाळगू या.

**प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना उत्तम मेंढपाळ बनून आपल्या कळपाची काळजी घेण्यास पुनरूत्थित ख्रिस्ताची कृपा व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपले राज्यकर्ते व अधिकारी ह्यांना सत्याने व न्यायाने राज्यकारभार करून देशाची प्रगती करण्यास उत्तम मेंढपाळ ख्रिस्त ह्याची प्रेरणा व मार्गदर्शन लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. सर्व श्रद्धावंतांनी ख्रिस्तसभेशी एकनिष्ठ राहून ख्रिस्ताला आपल्या जीवनाचे दार म्हणून स्वीकारावे व त्याची वाणी ऐकून त्याच्या कळपाचे आदर्श साथीदार बनावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपल्या धर्मग्रामातील सर्व मुलगामी व सामाजिक नेत्यांनी उत्तम मेंढपाळ प्रभू येशू ख्रिस्ताप्रमाणे निस्वार्थी वृतीने आपल्या लोकांची सेवा करावी व आपला गावपरिवार ख्रिस्ताला अभिप्रेत असा आदर्श कळप करावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. सर्व असहाय्य व निराश्रित लोकांना शांती आणि सुरक्षिततेचे वरदान लाभावे, प्रवासासाठी जाणा-यांवर प्रभूचा विशेष आशीर्वाद असावा, देशातील सार्वजनिक निवडणूका शांततेने व सत्यपूर्वक पार पडाव्यात तसेच सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती पासून आपले रक्षण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

**धर्मगुरू ः** हे स्वर्गीय पित्या तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.